# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र



०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in

जा.क्र. जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र/ /पोलीस अधिक्षक कार्यालय भंडारा, दिनांक:- /०९/२०१८


## “ विनयभंग करणाऱ्या आरोपीस एक वर्ष सश्रम कारावास व द्रव्यदंडाची शिक्षा”

पोलीस ठाणे जवाहरनगर अंतर्गत मौजा परसोडी येथिल संतोष ज्ञानेश्वर हटवार, वय ३० वर्ष रा. परसोडी ता. जि. भंडारा याने गावातीलच शाळकरी पिडित मुलगी वय १६ वर्ष हिचे जवळीकता साध्याकरीता नेहमी पाठलाग करीत असे. त्यास पिडितेने प्रतिकार केल्याने मारण्या पिटण्याची धमकी दिल्याचे आरोप सिध्द झाल्याने आज दिनांक ६.०९.२०१८ रोजी जिल्हा व सत्र न्यायालय भंडारा चे अतिरीक्त सत्र न्यायाधिश श्री. आर. पी. पांडे सा. यांनी आरोपीस एक वर्ष सश्रम कारावास व २००० रुपये द्रव्यदंडाची शिक्षा सुनावली.

याबाबत अधिक माहीती अशी की, पिडित शाळकरी मुलगी वय १६ वर्ष रा. परसोडी ता. जि. भंडारा हि परसोडी येथे तिचे मामा कडे लहान पणापसुन आपले आई सोबत राहत असुन ग्राम विकास विद्यालय, कोंढी येथे वर्ग ११ वी मध्ये शिक्षण घेत होती, नियमीत आपले गावावरून बसने शाळेत जात येत होती. गावात राहणारा ईसम संतोष ज्ञानेश्वर हटवार, वय ३० वर्ष हा सदर शाळकरी मुलीशी जवळीकता साधुन “मी तुझ्यावर प्रमे करतो व मला तुझ्या सोबत लग्न करायचे आहे” असे म्हणुन नेहमी पाठलाग करीत होता त्याबाबत सदर पिडित मुलीने माहे मार्च २०१४ ला पोलीस ठाणे जवाहरनगर येथे तक्रार केली त्यावरून सदर ईसमाविरूध्द कार्यवाही करण्यात आली होती. परंतु त्याचे वागणुकी मध्ये सुधारणा न होता दिनांक ६/०९/२०१४ रोजी सदर पिडित मुलगी शाळा पुर्ण करून दुपारचे २.०० वा. शाळेला सुट्टी झाल्याने शाळे समोरील बस स्थानकावर उभी असतांना संतोष ज्ञानेश्वर हटवार हा पिडितेचा पाठलाग करून जवळीकता साधण्याचा प्रयत्न करीत असता सदर पिडितेने त्यास प्रतिकार करून आपले शाळेत परत गेली व संतोष हटवार याचे वागणुकीबाबत शिक्षकांना सांगीतले त्यावरून शिक्षक यांनी पिडितेस तिचे घरी सोडुन दिले व पिडितीचे मामास झालेल्या घटणेबाबत सांगीतले असता त्यांचेसह पोलीस ठाणे जवाहरनगर येथे येवुन संतोष ज्ञानेश्वर हटवार, वय ३० वर्ष रा. परसोडी याचे विरूध्द तक्रार दिली. पिडितेचे तक्रारीवरून आरोपी विरूध्द अप.क्र .६९/१४ कलम ३५४(ड), ५०६ भादवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयाचा तपास पोलीस उप निरीक्षक पंकजकुमार चक्रे यांनी सुरु करुन गुन्हयातील आरोपी संतोष ज्ञानेश्वर हटवार, वय ३० वर्ष रा. परसोडी ता.जि.भंडारा यास तात्काळ अटक करून गुन्हयात घटणेबाबत योग्य साक्षपुरावा गोळा केला. आरोपी विरुध्द योग्य व सबळ पुरावे मिळुन आल्याने तसेच पिडित मुलगी हि अल्पवयीन असल्याने गुन्हयात कलम ११(१)(४), १२ बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक अधिनीयम २०१२ वाढ करून आरोपपत्र जिल्हा व सत्र न्यायालय भंडारा येथे दाखल केले. सदर आरोपपत्रास केस क्र. ३२/१४ अन्वये सुनावणी करीता ठेवण्यात आले.

सदर गुन्हयाची सुनावणी **अतिरीक्त सत्र न्यायाधिश श्री. आर. पी. पांडे सा.** यांचे न्यायालयात चालली गुन्हयात सरकार पक्षातर्फे **ॲडव्होकेट श्रीमती दुर्गा तलमले, सहा. सरकारी अभियोक्ता, सत्र न्यायालय भंडारा** यांनी योग्य बाजु मांडुन साक्षदार तपासले. आज दिनांक ६.०९.२०१८ रोजी गुन्हयाचे स्वरुप व गंभिरता लक्षात घेवुन **आरोपी संतोष ज्ञानेश्वर हटवार, वय ३० वर्ष रा. परसोडी** याचे विरुध्द दोषसिध्द झाल्याने **कलम ३५४(ड) भादवि मध्ये एक वर्ष सश्रम कारावास व २०००/-रुपये दंड, दंड न भरल्यास ६ महिणे सश्रम कारावासाची शिक्षा व कलम ५०६(२) भादवि अन्वये एक वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली**. सदर गुन्हयात सहा. पोलीस निरीक्षक, सुभाष बारसे, ठाणेदार पोलीस ठाणे जवाहरनगर यांचे मार्गदर्शनात पोलीस हवालदार किशोर ठेंगरी व वामन कुंभरे यांनी योग्य पैरवी अधिकारी म्हणुन कामकाज केले.

(जितेंद्र के. आडोळे)
पोलीस उपनिरीक्षक,
जनसंपर्क अधिकारी
संपर्क क्र. ०९४०३१०९७२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनीधी यांना उपरोक्त माहिती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत**, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.